# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२२

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**गुरुवार, दिनांक २४ मार्च, २०२२ / चैत्र ३, १९४४ (शके)**

**(१) उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा मंत्री**
**(२) ऊर्जा मंत्री**
**(३) इतर मागास बहुजन कल्याण, खार जमिनी विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री**
**(४) आदिवासी विकास मंत्री**
**(५) सहकार, पणन मंत्री**
**(६) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

**प्रश्नांची एकूण संख्या - २२**

## नवी मुंबई येथील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्यालय इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत

**(१) * १२८८३ श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई येथील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्यालयाची प्रशासकीय तीन मजली इमारत कांदा-बटाटा मार्केटमध्ये असून, या इमारतीची दुरवस्था झाली आहे तसेच दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावरील लेखा विभागाचा स्लॅब धोकादायक झाल्यामुळे पोलादी रॉडचे टेकू लावण्यात आले असल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीचा स्लॅब कधीही कोसळण्याची शक्यता असल्याने कांदा-बटाटा मार्केट आवारातील प्रशासकीय कार्यालयात संचालक मंडळाच्या बैठकीनिमित्त येणारे अधिकारी/ कर्मचारी तसेच तेथील अभियांत्रिकी, लेखा अधिकारी व अन्य अधिकारी/ कर्मचारी, व्यापारी व नागरिकांच्या जिवीतास धोका निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त इमारतीच्या पुनर्विकासाची प्रक्रिया कार्यान्वित असताना मा.उच्च न्यायालयात दावे दाखल झाल्याने पुनर्विकासाचे काम प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, सदर दावे कोणी दाखल केले आहेत व त्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने यापूर्वीही कांदा-बटाटा मार्केटच्या आवारात बांधकाम कोसळण्याची घडलेली घटना लक्षात घेता, सर्व संबंधितांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नवी मुंबईच्या कांदा-बटाटा मार्केटमधील इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर दुरवस्था झाली आहे. त्याअनुषंगाने मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती, नवी मुंबईने सदर ठिकाणाची दुरूस्ती करण्याचे प्रस्तावित केले आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

मा.उच्च न्यायालयात दाखल याचिका क्र.११३३४/१३ मधील दिनांक २१/०४/२०१५ मधील आदेशानुसार मा.उच्च न्यायालयाची परवानगी घेऊन दुरूस्तीचे काम करण्याबाबत निर्देश दिले आहेत. तथापि, मा.उच्च न्यायालयाने दिनांक १७/०४/२०१७ रोजीच्या आदेशामध्ये दुरूस्तीच्या कामकाजासंदर्भात प्राप्त आक्षेपांचा नियमानुसार विचार करून पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी निर्णय घेण्यात यावा व बाजार समिती निवडणूकांबाबत सद्य:स्थिती मा.उच्च न्यायालयास कळवावी असे निर्देश दिलेले आहे. मा.उच्च न्यायालयात सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्हयातील शेतजमिनी विविध औद्योगिक प्रकल्पांकरिता संपादित करण्यात येत असल्याबाबत

**(२) * १२२१० श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) येथे एमआयडीसी व जेएसडब्ल्यू प्रकल्पासाठी आणि विरार-अलिबाग कॉरिडॉरसाठी तसेच रोहा (ता.मुरुड) येथे फार्मा पार्क प्रकल्पासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून भूसंपादनाची प्रक्रिया सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वडखळ (ता.पेण) परिसरातील शेतकऱ्यांच्या जमिनी तसेच मुरूड तालुक्यातील १० गावे व रोहा तालुक्यातील ७ गावे अशा एकूण १७ गावांतील ३ हजार हेक्टर जमिनी संपादित केल्या जाणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्हयातील गत २० वर्षात सुमारे ३९ हजार २६४ हेक्टर शेतजमिन म्हणजेच जवळपास ९८ हजार १६० एकर शेतजमिन अनेक औद्योगिक प्रकल्पांसाठी संपादित करण्यात आल्या असून अन्य ५२ हजार ६२ एकर क्षेत्र शेतजमिन अन्य कारणांसाठी शासनाकडून संपादित करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रायगड जिल्हयात यापूर्वी औद्योगिक प्रकल्पांसाठी जे भूसंपादन करण्यात आले आहे, त्यातील हजारो एकर जागा विनावापर पडून आहेत तसेच पाताळगंगा, रोहा, महाड एमआयडीसीतील अनेक उद्योगधंदे बंद पडल्याने त्यांची जागाही विनावापर पडून असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करताना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता केली जात नसून, स्थानिकांनाही नोकरीत सामावून घेतले जात नाही तसेच सदर प्रकल्पांचा पर्यावरणावर विपरीत परिणाम होत असून उक्त परिसरातील शेतकऱ्यांना व प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या भूसंपादित क्षेत्रातील जागा परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) हे अंशत: खरे आहे.

पेण (जि.रायगड) एमआयडीसीसाठी तसेच जेएसडब्ल्यू प्रकल्पासाठी तसेच रोहा (ता.मुरुड) येथे फार्मा पार्क प्रकल्पासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत भूसंपादनाची प्रक्रिया सुरु आहे. तसेच विरार-अलिबाग कॉरिडॉरसाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून भूसंपादनाची प्रक्रिया प्रस्तावित आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

म.औ.वि. महामंडळाने डोलवी औद्योगिक क्षेत्रासाठी वडखळ (ता.पेण) मधील ११ व अलिबाग तालुक्यातील १ अशा १२ गावातील खाजगी व सरकारी मिळूण एकूण ८५८.६०२१ हे.आर. तसेच रोहा मुरुड औद्योगिक क्षेत्रासाठी मुरुड तालुक्यातील १० व रोहा तालुक्यातील ७ अशा एकूण १७ गावातील खाजगी व सरकारी मिळूण एकूण १९९४.९६९ हे.आर. असे दोन्ही औद्योगिक क्षेत्राकरिता एकूण २८५३.५७११ हे.आर. क्षेत्राकरिता म.औ.वि.अधिनियम १९६१ अन्वये प्रकरण ६ ची अधिसूचना निर्गमित करण्यात आलेली आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

(५) औद्योगिक क्षेत्राकरिता जमिनीचे भूसंपादन करताना स्थानिक शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन जमिनीच्या नुकसान भरपाईचा दर वाटाघाटीने निश्चित करण्यात येतो. म.औ.वि. महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार प्रकल्पग्रस्तांना उद्योग धंद्यासाठी सवलतीच्या दरात विकसीत पीएपी भूखंड वाटप करण्यात येतात. तसेच प्रकल्पामध्ये भूमिपुत्रांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी रोजगारासाठी लागणारे कौशल्य आत्मसात करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

म.औ.वि. महामंडळाच्या अधिपत्याखाली स्थापन झालेल्या औद्योगिक क्षेत्रामध्ये उदा. तळोजा, पाताळगंगा, रोहा, उसर, विळेभागाड, महाड, नागोठणे येथे मोठे औद्योगिक क्षेत्र विकसित झालेले आहेत. मोठ्या प्रमाणात आर्थिक गुंतवणूक होवून तेथे स्थानिक प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. तसेच ते स्वतंत्रपणे स्वयंरोजगार देखील करु शकतात. म.औ.वि.महामंडळाच्या दिनांक २६/०८/२०१९ रोजीच्या परिपत्रकानूसार प्रकल्पग्रस्तांना १० टक्के परतावा भूखंड वाटप करण्याचे धोरण ठरलेले आहे.

सदर औद्योगिक क्षेत्रामध्ये स्थापन झालेल्या प्रकल्पातून प्रक्रिया केलेले सांडपाणी खोल समुद्रात १० कि.मी. आत सोडण्यात येणार आहे. तसेच प्रकल्पातून होणारे वायु प्रदूषण व रासायनिक प्रदूषण याबाबत संबंधित उद्योजकाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत त्यांच्या प्रकल्पाचा प्रकल्प अहवाल तपासून उद्योजकांना परवानगी देण्यात येतात. त्यांच्या नियंत्रणाखाली वेळोवेळी उद्योगांची तपासणी करण्यात येते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील प्रलंबित वनहक्क दावे निकाली काढण्याबाबत

**(३) * १२४३४ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यात शेकडो वनहक्क दावे प्रलंबित असून मुरबाड-२९, शहापूर-२०३, कल्याण-३ व अंबरनाथ-२१ इ. तालुक्यांतील एकूण २५६ वनहक्क दावे तसेच वनहक्क दाव्यांवरील प्रलंबित अपिलांची संख्या मुरबाड-३०३, शहापूर-६८, कल्याण-२६ व अंबरनाथ-५६ असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वनहक्क दावे निकाली काढण्याबाबत पाठपुरावा करुनही शासनाकडून कोणतीही कार्यवाही होत नसल्याने उपविभागीय कार्यालय, ठाणे येथे श्रमिक मुक्ती संघटनेच्यावतीने धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे पत्र संघटनेने जिल्हाधिकारी, ठाणे यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कल्याण, अंबरनाथ, शहापूर व मुरबाड तालुक्यातील वनहक्क दावे निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी :** (१) होय, हे खरे आहे.

(२) श्रमिक मुक्ती संघटना, मुरबाड यांनी वनहक्कधारकांचे प्रलंबित दावे, अपिले व अन्य प्रलंबित प्रश्नांच्या निपटाऱ्याच्या मागणीसाठी दिनांक १३/१२/२०२१ रोजी उपविभागीय कार्यालय, कल्याण यांच्या कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले होते.

(३) कल्याण तालुक्यातील ०३ वनहक्क दाव्यांपैकी ०२ दावे जिल्हास्तरीय समितीने अमान्य केले असून १ दावा जी.पी.एस. मोजणीकरिता वनक्षेत्रपाल, कल्याण यांच्याकडे प्रलंबित आहे. तसेच प्रलंबित २६ अपिलांबाबत उपविभागीय अधिकारी, कल्याण यांचे कार्यालयात दिनांक २०/१२/२०२१ रोजी शिबीर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबिरामध्ये दावेदारांनी सादर केलेले पुरावे अपिलांच्या मूळ दाव्यामध्ये समाविष्ठ करण्यात आले असून त्याबाबत उपविभागीय अधिकाऱ्यांकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

मुरबाड तालुक्यातील २९ प्रलंबित वनहक्क दाव्यांबाबत दिनांक ०६/०१/२०२२ व दिनांक १३/०१/२०२२ रोजी उपविभागस्तरीय समिती, कल्याण यांच्याकडून मुरबाड येथे बैठक आयोजित करून संबंधित दावेदारांना पुरावे सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत व काही दावे जी.पी.एस. मोजणी व गुगल इमेजसाठी वनक्षेत्रपाल यांच्याकडे पाठविले आहेत. तसेच ३०३ अपिलांबाबत मुरबाड तहसिल कार्यालय, मुरबाड येथे दिनांक ०६/०१/२०२२ रोजीच्या शिबिरामध्ये संघटनेच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत अमान्य अपिलांची तपासणी करण्यात आली असून उर्वरीत अपिलांबाबत दिनांक १३/०१/२०२२ च्या शिबिरामध्ये पुरावे सादर करण्यात आले असून सदरची अपिले उपविभागस्तरीय समितीकडे प्रलंबित आहेत.

शहापूर तालुक्यातील २०३ प्रलंबित वनहक्क दाव्यापैकी ६३ दावे मान्य करण्यात आले असून १६ दावे पुरावे नसल्याने अमान्य करण्यात आले आहेत. ३३ दाव्यामध्ये त्रुटी असल्याने त्रुटीपुर्तता करणेबाबत दावेदार यांना कळविले आहे. ११ दावे जिल्हास्तरीय समितीच्या निर्णयास्तव प्रलंबित आहेत. ०३ दावे दुबार आहेत. तसेच ७७ दावे उपविभागीय समितीकडे प्रलंबित आहेत. श्रमिक मुक्ती संघटना यांना दावे पडताळणी करणेकरिता वेळ दिला असता, दिनांक १६/०२/२०२२ रोजी श्रमिक मुक्ती संघटनेच्या शिष्टमंडळाने प्रकरणांची पडताळणी केली आहे. जिल्हास्तरीय समितीव्दारे ६८ अपिल दाव्यांबाबत सुनावणी घेण्यात आली असून दावेदारास उपलब्ध पुरावे सादर करणेबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.

अंबरनाथ तालुक्यातील २१ दाव्यांपैकी १३ दावे जी.पी.एस. मोजणीकरिता पाठविले असून ०८ दावे दुबार आढळून आले आहेत. दुबार दाव्यांची तपासणी करून त्याबाबत जिल्हास्तरीय वनहक्क समितीव्दारे निर्णय

घेण्यात येणार आहे. तसेच ५६ प्रलंबित अपिलांबाबत दिनांक २३/१२/२०२१ रोजी आयोजित शिबिरामध्ये श्रमिक मुक्ती संघटनेच्या प्रतिनिधींनी दाव्यांची तपासणी केली आहे. यामध्ये ११ दावेदारांनी पुरावे सादर केले असून ४५ दाव्यामध्ये कोणतेही पुरावे नसल्याने त्याची पडताळणी करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील सार्वजनिक मालमत्ता व वास्तुंची तौक्ते चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई मिळण्याबाबत

**(४) * ११९५८ श्री.सुनिल शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १०८३७ ला दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आपत्ती व्यवस्थापन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यांमध्ये तौक्ते चक्रीवादळामुळे मालमत्तेच्या झालेल्या नुकसानीकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड यांनी दिनांक ८ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या पत्रान्वये रुपये ३०४८.२० लक्ष इतक्या निधीची मागणी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने जिल्हा परिषद, रायगड यांना नुकसान भरपाईपोटी शासनाने किती रुपयांचा निधी वितरित केला आहे आणि उर्वरित निधी केव्हा वितरीत करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, ग्रामपंचायत इमारती, समाजमंदिरे, जिल्ह्यातील गोदामे, स्मशानभूमी, पिण्याच्या पाण्याच्या योजना या सर्व कामांसाठी रुपये ३५ कोटी एवढा निधी देण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, उक्त निधी संबंधित विभागाकडे सोपविण्यात आला आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नुकसान झालेल्या वास्तुंच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत तसेच अद्यापपर्यंत नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्यात आली नसल्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार :** (१) खरे आहे.

(२) सदरहू मागणीच्या अनुषंगाने संबंधित विभागीय आयुक्त यांच्यामार्फत रायगड जिल्ह्यातील ४९२ जिल्हा परिषद शाळांच्या इमारत दुरूस्तीसाठी रुपये ७३८.०० लक्ष इतका निधी जिल्हाधिकारी, रायगड यांना दिनांक ०७/०३/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये उपलब्ध करून दिला आहे.

(३) व (४) खरे नाही.

तौक्ते चक्रीवादळामुळे नुकसान झालेल्या सर्व जिल्हयांमधील अनुज्ञेय असलेल्या सार्वजनिक मालमत्तांच्या दुरूस्तीसाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून रुपये ६६४.९९ लाख इतका निधी राज्य कार्यकारी समितीने मंजूर केला आहे. तथापि, राज्य आपत्ती प्रतिसाद निधी संपुष्टात आल्याने मदत देणे शक्य झाले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महावितरण कंपनीवरील आर्थिक भार कमी करण्याच्यादृष्टीने उपाययोजना करण्याबाबत

**(५) * १२०५८ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महावितरणच्या कामाचे विकेंद्रीकरण करून ग्राहकांना चांगल्या सेवा देण्यासाठी कोकण, पुणे, औरंगाबाद, नागपूर अशी चार प्रादेशिक संचालक कार्यालये स्थापन करण्यात आली असून, थकबाकी वसूलीसह विविध कामामध्ये गती येवून पायाभुत सुविधा उभारणेबाबत तथा इतरही कार्ये करण्याबाबत ही कार्यालये सक्षम असल्याचे महावितरणच्या प्रसिध्दी विभागाने कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ग्राहकांकडे वीज देयकापोटी थकीत असलेले रुपये ७५ हजार कोटी, कंपनीवरील रुपये ६० हजार कोटींचे कर्ज अशा एकूण रुपये १ लाख ३५ हजार कोटींच्या भारामुळे महावितरण अडचणीत आलेले असून ग्राहक सेवा, देयक वसुली, उत्पादनाशी या कार्यालयाचा संबंध नसल्याने महावितरणला रुपये ३२ कोटींचा आर्थिक भार येत असल्याची बाब दिनांक २ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली असून याबाबत

महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीसीटी वर्क्स फेडरेशनने प्रादेशिक संचालकाला योग्य अधिकार नसल्याबाबत ही कार्यालये बंद करावी अशी मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महावितरणच्या कामाचे विकेंद्रीकरण करून ग्राहकांना चांगल्या सेवा देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या कोकण, पुणे, औरंगाबाद, नागपूर अशा चार प्रादेशिक संचालक कार्यालयांना कोणतेही महत्त्वाचे अधिकार देण्यात आले नसून या कार्यालयाचे महत्व लक्षात घेता तथा कामाचे नियोजन व विकेंन्द्रीकरणामुळे व उपलब्धतेमुळे अधिकार क्षेत्रात वाढ करून शासन मान्यता देणार आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनने महावितरणाचा आर्थिक भार कमी करण्यासाठी ही कार्यालये बंद करण्याच्या केलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणता धोरणात्मक निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) हे खरे आहे.

सदर बातमी महावितरणच्या प्रसिध्दी विभागातर्फे दै. लोकसत्ता, नागपूर दिनांक ०२/०१/२०२२ रोजीच्या अंकात प्रसिध्द झाली आहे.

(२) हे खरे नाही.

महावितरणने जरी या चार प्रादेशिक संचालक कार्यालयांकरिता २०५ पदे मंजूर केली असली तरी तेथे असलेल्या कर्मचाऱ्यांपैकीच आवश्यक ती नेमणूक करण्यात आली आहे.

(३) महावितरण मंडळ ठराव क्र.६६८, दिनांक ३०/०४/२०१६ अन्वये चार प्रादेशिक कार्यालये निर्माण करण्यात आली. तेव्हापासून प्रादेशिक संचालक कार्यालयांना आवश्यक ते महत्वाचे अधिकार देण्यात आले आहेत. तसेच ठराव क्र.१८६८, दिनांक ०३/०८/२०१९ अन्वये पुढील आदेश किंवा तीन वर्षापर्यंत या प्रादेशिक कार्यालयांना मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुसळगाव (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना औद्योगिक व वाणिज्य भूखंड मिळण्याबाबत

**(६) * ११७७५ श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुसळगाव (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील शेतकऱ्यांच्या जमिनी इंडियाबुल्स या सेझ प्रकल्पात गेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना उक्त जमिनीऐवजी औद्योगिक व वाणिज्य भूखंड देण्याचे लेखी आश्वासन शासनाच्या वतीने देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना अद्याप कोणत्याही स्वरूपाचे औद्योगिक व वाणिज्य भूखंड मिळाले नसुन प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी वारंवार शासनाकडे याबाबत पाठपुरावा देखील केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना औद्योगिक व वाणिज्य भूखंड देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही. मौजे-गुळवंच व मौजे-मुसळगाव, ता.सिन्नर, जिल्हा-नाशिक येथील मे. इंडियाबुल्स यांच्या विशेष आर्थिक क्षेत्रात ८२९ प्रकल्पग्रस्त आहेत. त्यापैकी एकूण वाटप करावयाच्या अथवा देय भूखंडाची संख्या ४८२ आहे. त्यापैकी २०० प्रकल्पग्रस्तांना भूखंडाचे वाटप करण्यात आलेले आहे. उर्वरित २८२ भूखंडाचे वाटप करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) व (५) उर्वरित प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना भूखंड वाटप करण्यासाठी ११२.८८ हे. आर. इतक्या क्षेत्राची आवश्यकता आहे. त्याकरिता महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ मधील कलम ३३(३) अन्वये १२७.४९ हे. आर. क्षेत्र भूसंपादन करण्याची कार्यवाही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत सुरु आहे. तथापि, अद्यापपर्यंत सदर क्षेत्राचा ताबा अप्राप्त आहे.

-----------------

## राज्यातील साखर कारखान्यांनी ऊसाचे विनापरवाना गाळप केल्याबाबत

**(७) * १२७२८ श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०२०-२०२१ च्या गळीत हंगामात राज्यातील १८ साखर कारखान्यांनी गाळप परवाना नसताना गाळप केलेले असून महाराष्ट्र राज्य साखर कारखाने क्षेत्र आरक्षण व गाळप आणि ऊस वितरण नियमन आदेश, १९८४ व शासन अधिसूचना दिनांक १४ सप्टेंबर, २०१५ मधील तरतुदीनुसार सदर १८ साखर कारखान्यांवर दंड आकारणी आदेश बजावण्यात आले असून त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(२) असल्यास, ऊस नियंत्रण आदेश १९६६ चे अनुषंगाने साखर कारखान्यांनी शिस्त पाळण्यासाठी राज्य शासनाने केलेल्या कायद्याचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, गाळप परवानारहित असलेल्या १८ साखर कारखान्यांना परवाना अधिकाऱ्यांनी दंड ठोठावला असून उक्त कारखान्यांनी परवाना अधिकारी यांचे दंड आदेशाच्या विरोधात शासनाकडे सुनावणीकरिता अपील अर्ज दाखल केलेले असून यासंदर्भात शासनाने तातडीने निर्णय देऊन सदर कारखान्यांवर वसूलीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) २०२०-२०२१ गाळप हंगामात १९ कारखान्यांनी गाळप परवाना अटी व शर्तीची पुर्तता केली नव्हती म्हणून गाळप परवाना दिलेला नव्हता. सदर कारखान्यांनी गाळप परवाना अटी व शर्ती पूर्ण केल्यानंतर गाळप परवाना दिलेला आहे. तथापी गाळप परवाना देणेपुर्वी या १९ कारखान्यांनी ऊस गाळप सुरू केले होते. विनापरवाना केलेल्या गाळपावर महाराष्ट्र राज्य साखर कारखाने (क्षेत्र आरक्षण व गाळप आणि ऊस वितरण नियमन) आदेश, १९८४ व शासन अधिसूचना दिनांक १४ ऑक्टोबर, २०१५ मधील तरतुदीनुसार दंड आकारण्यात आलेला आहे. या कारखान्यांनी शासनाकडे अपील केले असल्यामुळे सदर प्रकरणी अपिलावर निर्णय प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(२) ऊस नियंत्रण आदेश, १९६६ अन्वये राज्य शासनाला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार साखर कारखान्यांनी शिस्त पाळण्यासाठी राज्य शासनाने महाराष्ट्र राज्य साखर कारखाने (क्षेत्र आरक्षण व गाळप आणि ऊस वितरण नियमन) आदेश, १९८४ मध्ये शासन अधिसूचना दिनांक १४ ऑक्टोबर, २०१५ नुसार कारखान्यांनी विनापरवाना गाळप केल्यास रुपये ५००/- प्रति टन दंड आकारण्याची तरतूद आहे.
(३) सदर कारखान्यांनी परवाना अधिकारी तथा साखर आयुक्त यांचे दंडाचे आदेशाविरूध्द शासनाकडे अपील केले आहे. १९ पैकी ११ कारखान्यांच्या अपिलावर शासनाकडून स्थगिती देण्यात आलेली आहे. उर्वरीत कारखान्यांच्या अपिलावर शासन स्तरावर सुनावणीची कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील दिव्यांग शाळामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे नियमित वेतन अदा करण्याबाबत

**(८) * १२९३१ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील समाजकल्याण विभागांतर्गत चालवल्या जाणाऱ्या दिव्यांग अनुदानित शाळांचे वेतन शासनाकडून अदा करण्यात येत असून यातील काही शाळा निवासी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू दिव्यांग शाळांमधील एक हजारांहून अधिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्याना माहे ऑक्टोबर, २०२१ पासूनचे मासिक वेतन न मिळाल्यामुळे सदर कर्मचाऱ्यांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत असून शिक्षक भारती संघटनेच्या दिव्यांग विभागाने मा मुख्यमंत्री, मा सामाजिक न्यायमंत्री, संचालक, समाज कल्याण संचालनालय, सचिव, सामाजिक न्याय विभाग आदींकडे पत्र पाठवून सदरहू कर्मचाऱ्याचे मासिक वेतन तातडीने अदा करण्यासंदर्भात माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिव्यांग शाळांमधील सदरहू शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे माहे ऑक्टोबर, २०२१ पासूनचे मासिक वेतन वेळेवर अदा न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील दिव्यांग अनुदानित शाळेतील कर्मचाऱ्यांना माहे ऑक्टोबर, २०२१ पासूनचे मासिक वेतन नियमितपणे न मिळल्याप्रकरणी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कर्मचाऱ्यांना थकबाकीसह नियमितपणे वेतन विनाविलंब अदा होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.
(३) कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे शासनाकडुन टप्प्याटप्प्याने दरमहा वेतनाची तरतूद उपलब्ध करुन देण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वालसावंगी (ता.भोकरदन, जि.जालना) येथील शेतकऱ्यांच्या कृषीपंपाचा वीज पुरवठा खंडीत केल्याबाबत

**(९) * १३४१२ श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेश कराड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वीज बिल वसुलीसाठी खंडीत केलेला वीज पुरवठा पुर्ववत सुरू करण्याच्या मागणीसाठी वालसावंगी (ता.भोकरदन, जि.जालना) येथील शेतकऱ्यांनी अजिंठा-बुलढाणा महामार्गावर रास्तारोको आंदोलन केले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांकडून थकीत वीज बिल वसूल करण्यासाठी वीज वितरण कंपनीने सुरू केलेली कारवाई अन्न सुरक्षा कायद्याचे उल्लंघन करणारी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे रब्बी हंगामातील पिकांना पाण्याची गरज असताना वीज पुरवठा खंडीत करून, पिकांचे नुकसान केले जात आहे तसेच दुग्ध व्यवसायासाठी पाळलेल्या जनावरांना पाणी मिळत नसल्यामुळे जनावरांचे आरोग्य धोक्यात आल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अन्न सुरक्षा कायदा २०१३ नुसार शेती व दूध उत्पादनात वाढ करण्यासाठी या परिशिष्ट ३ मधील कलम ३१ नुसार शासन अन्न सुरक्षेसाठी कोणते प्रयत्न करीत आहे वा करणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ मधील कलम ३१ नुसार अनुसूची तीन मध्ये विनिर्दिष्ट केलेली उद्दिष्टामध्ये इतर बाबी सोबत वीज क्षेत्रात गुंतवणुक होण्याच्या दृष्टीने कृषी फीडर विलगीकरण, सौर कृषी पंप उपलब्धता, उच्च दाब वितरण प्रणाली योजना, उपकेंद्र निर्मिती/ क्षमतावृध्दी, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, कृषी पंप वीज जोडणी धोरण-२०२० इ. पायाभूत सुविधा योजना राबविण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर महानगरपालिका कर्मचारी सहकारी बँकेकडे संगणक कर्जासाठी बनावट फर्मचे कोटेशन सादर केल्याबाबत

**(१०) * १३०५० श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिका कर्मचारी सहकारी बँकेकडे संगणक कर्जासाठी अर्ज केलेल्या कर्मचाऱ्यांना कर्ज वाटपाचे धनादेश जीएसटीसह देण्यात आले, मात्र संगणकासाठी सादर केलेले कोटेशन बनावट फर्मचे असल्याने शासनाचा जीएसटी बुडाला असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संगणक कर्जासाठी बनावट फर्मचे कोटेशन सादर करुन शासनाचा जीएसटी बुडविणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) व (२) नागपूर महानगरपालिका कर्मचारी सहकारी बँक मर्या., नागपूर या बँकेच्या संगणक कर्ज वाटप प्रकरणात झालेल्या अनियमीततेसंदर्भात बँकेच्या भागधारकांनी दिनांक २३/११/२०२१ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचेकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. त्यानुषंगाने चौकशी करण्यासाठी नियुक्त केलेल्या उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर शहर-२ यांनी संगणक खरेदी कर्ज प्रकरणाचे लेखापरिक्षण करण्याबाबतचे अभिप्राय चौकशी अहवालात नमूद केले होते.

त्यानुसार संगणक खरेदी कर्ज प्रकरणाचे लेखापरिक्षण करण्याकरिता जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांनी दिनांक २४/१२/२०२१ रोजीच्या आदेशान्वये श्री.एन.बी. कोंडावार, विशेष लेखापरिक्षक वर्ग-२, नागपूर यांची नियुक्ती केली आहे. त्यानुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण (महाज्योती) संस्थेची विभागीय कार्यालये सुरु करण्याबाबत

**(११) * १३१२५ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण (महाज्योती) संस्थेकडून शेतकऱ्यांना करडई बियांसाठी रुपये साडेतीन कोटींचा निधी वाटप करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त संस्थेच्या स्थापनेपासून गत दोन वर्षात विभागीय कार्यालये सुरु झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विभागीय कार्यालये सुरु करण्यात आली नसल्यामुळे महाज्योतीकडून शेतकऱ्यांना निधी वाटप करण्याबाबत आक्षेप नोंदविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महाज्योती संस्थेची विभागीय कार्यालये सुरु करुन शेतकऱ्यांसाठी करडई तेलबियांचे उत्पादन, प्रक्रिया व विक्री यासाठी निधी वाटप करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार :** (१) हे अंशतः खरे आहे.

महाज्योतीच्या (Memorandum of Association) उद्दिष्ट क्र., २१ ७८ व १०३ नुसार शेतकऱ्यांना आर्थिक विकासाकरिता शेती विषयक प्रकल्प राबविणे, मार्केटिंग व निर्यात वाढ इत्यादीचा समावेश करण्यात आला आहे.

त्यानुसार तेलबिया उत्पादन, प्रक्रिया व विपणन प्रकल्प पथदर्शी स्वरुपात राबविण्यात येत आहे. महाज्योती संस्थेमार्फत ऑनलाईन नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना केंद्र शासनाच्या आय.सी.एम.आर. हैद्राबाद तसेच कृषी विद्यापीठ, राहुरी व कृषी विद्यापीठ, परभणी यांच्याकडून खरेदी करुन शेतकऱ्यांना तेलबियांचे वाटप करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांना तेलबिया उत्पादनात प्रोत्साहन म्हणून ७ जिल्ह्यात ६९४९ शेतकऱ्यांना एकूण ५२२.२८ क्विंटल बियाणे मोफत वाटण्यात आले आहे.

(२) महाज्योतीने औरंगाबाद व नाशिक येथे प्रादेशिक कार्यालये सुरू केले असून पुणे व रत्नागिरी येथील प्रादेशिक कार्यालय सुरू करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सामाजिक न्याय विभागाकडून इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडे पदे वर्ग करण्याबाबत

**(१२) * १३१६४ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागाने सन २०१८ मध्ये स्वतंत्र इतर मागास बहुजन कल्याण विभाग स्थापन केला आहे. तसेच यासंदर्भातील शासन निर्णय जारी करुन सामाजिक न्याय विभागातील ३४० पदे ही इतर मागास बहुजन कल्याण विभागाला वर्ग करण्याचे निश्चित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापही उक्त ३४० पदे सामाजिक न्याय विभागाकडून इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडे वर्ग करण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे काम अजूनपर्यंत पूर्ण क्षमतेने सुरू झाले नसून, उपरोक्त पदे शासनाकडून तातडीने इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडे वर्ग करण्यात आली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर ३४० पदे इतर मागास बहुजन कल्याण विभागाला वर्ग करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) हे खरे आहे.

विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, शासन आदेश दिनांक १९/०७/२०१८, दिनांक १३/०८/२०१८ व दिनांक २५/०६/२०१९ नुसार सामाजिक न्याय व विशेष सहाय्य

विभागाकडून एकूण ४३१ पदे वर्ग करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. तद्नंतर उपसमितीच्या दिनांक १७/०२/२०२० रोजीच्या बैठकीत एकूण ३५५ पदे वर्ग करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा आकृतिबंध सन २००४ च्या शासन निर्णयानुसार मंजूर आहे. त्यामध्ये सुधारणा करून सुधारित आकृतिबंध तयार करण्यात येत असून त्यामध्ये इतर मागास बहुजन कल्याण संचालनालयाकडे वर्ग करावयाच्या पदांचा समावेश करण्यात आलेला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खोपणे (ता.उरण, जि.रायगड) येथील प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या मंजूर करण्याबाबत

**(१३) * १३२१७ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोपणे (ता.उरण, जि.रायगड) येथील सुमारे ४५ शेतकऱ्यांच्या २१ एकर जमिनी ह्या अत्यंत अल्प किमतीत विर्गो डिस्ट्री पार्क या कंपनीसाठी संपादित करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीच्या आस्थापनेकडून प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना कंपनीच्या माध्यमातून नोकरी, रोजगार तसेच कंपनीमध्ये प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी केलेल्या कामांच्या माध्यमातून होणाऱ्या नफ्यामधून काही निधी हा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या विकासाकरिता उपलब्ध करून देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपनीकडून प्रकल्पग्रस्तांना दिलेल्या आश्वासनाची पूर्तता न केल्यामुळे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी विर्गो डिस्ट्री पार्क कंपनीसमोर अनेक वेळा आंदोलन करून देखील न्याय न देता कंपनीकडून प्रकल्पग्रस्त आंदोलकांवर खोटे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या पूर्ण करून त्यांना न्याय मिळावा याकरिता कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही. विर्गो डिस्ट्री पार्क या कंपनीने कंपनीसाठीच्या जमिनी स्थानिक शेतकऱ्यांकडून खरेदी खतान्वये रीतसर खरेदी केलेल्या आहेत.

(२) कंपनीने जमिनी खरेदीने घेतल्या असल्याने या प्रकल्पात, प्रकल्पग्रस्त शेतकरी नाहीत. तथापि, कंपनीने स्थानिक लोकांना आस्थापनेत समाविष्ट करुन घेतले आहे.

(३) स्थानिक शेतकरी व शेतकरी संघटनेने दिनांक २०/०३/२०२० रोजी विग्रो डिस्ट्री पार्क या कंपनीच्या गेटवर आंदोलन केले होते. या प्रकरणी कंपनीच्या संचालकांनी उरण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्याचप्रमाणे, एका कामगारास काही अनोळखी माणसांनी मारहाण केल्याने, त्या कामगाराने दिलेल्या तक्रारीबाबत अदखलपात्र गुन्हा दाखल केल्याचे उरण पोलीस ठाणे कडून प्राप्त अहवालावरुन दिसून येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वेस्ट ग्रील्ड सोल्युशन व ऊर्जा इंफ्राटेक ॲण्ड पॉवर प्रोजेक्ट प्रा. लि. या कंपन्यांच्या गैरव्यवहार व वित्तीय अनियमिततेबाबत

**(१४) * १३५२४ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबईने वेस्ट ग्रील्ड सोल्युशन व ऊर्जा इंफ्राटेक ॲण्ड पॉवर प्रोजेक्ट प्रा. लि. या दोन कंपन्यांना नियमबाह्य कामे देवून करोडो रुपयांचा गैरव्यवहार, वित्तीय अनियमितता व

फसवणूक केल्याबाबतच्या प्रकरणांची चौकशी करण्याचे आदेश शासनाने दिले असल्याची बाब दिनांक १४ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणांचा चौकशी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, अहवालात करण्यात आलेल्या शिफारशींचे थोडक्यात स्वरूप काय आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई येथील वेस्ट ग्रील्ड सोल्युशन व ऊर्जा इंफ्राटेक ॲण्ड पॉवर प्रोजेक्ट प्रा. लि. या कंपन्यांनी केलेल्या वित्तीय अनियमितता व गैरव्यवहाराबाबत शासनाने चौकशी करण्याचे आदेश दिलेले आहेत.
(२) व (३) सदर चौकशी अहवाल अद्याप अप्राप्त आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विशेषत: नाशिक जिल्ह्यातील लाभार्थ्यांना संजय गांधी दिव्यांग योजनेचे अनुदान मिळत नसल्याबाबत

**(१५) * १२९८१ श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विशेषत: नाशिक जिल्ह्यातील बँकांचे आयएफएससी कोड मॅंच होत नसून गत चार महिन्यांपासून संजय गांधी दिव्यांग योजनेचे अनुदान लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा न झाल्याने दिव्यांग लाभार्थी शासनाच्या अनेक योजनांपासून वंचित राहत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संजय गांधी योजनेंतर्गत दरमहा एक हजार रुपयाचे अनुदान दिव्यांगाच्या खात्यात जमा केले जाते, परंतु देना बँकचे बँक ऑफ बडोदामध्ये विलिनीकरण झाले असून, सदर बँकेकडे संजय गांधी योजनेचा निधी हस्तांतरित करण्यात आलेला नाही, हे ही खरे काय,

(३) असल्यास, संपूर्ण राज्यातील दिव्यांग लाभार्थ्यांना योजनेचे अनुदान नियमित अदा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, याबाबतचे निवेदन प्रहार संघटनेकडून मा.जिल्हाधिकारी यांना देण्यात आले असून त्यानुषंगाने शासनाने सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) नाशिक जिल्ह्यामधील विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांना माहे डिसेंबर, २०२१ पर्यंतचे अर्थसहाय्य वितरित करण्यात आले आहे. माहे जानेवारी व फेब्रुवारी, २०२२ चे अर्थसहाय्य लाभार्थ्यांना वितरणाची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हयातील समाजकल्याण विभागाच्या दिव्यांग शाळेतील विद्यार्थ्यांना परिपोषण भत्ता वितरित करण्याबाबत

**(१६) * १३०८७ श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील समाजकल्याण विभागांतर्गत ९० शाळा कार्यरत असून त्यातील ६१ शाळा अनुदानित तर २९ शाळा खाजगी अनुदानित असून, निवासी शाळांमधून शिक्षण घेणाऱ्या एक ते अठरा वर्षापर्यंतच्या दिव्यांग विद्यार्थ्यांना नाश्ता, दोन वेळचे जेवण आणि गणवेशाची तरतूद आहे. परंतु गत दोन वर्षापासून एक हजार विद्यार्थ्यांना रुपये ३६ कोटींचा परिपोषण भत्ता दिला गेला नसल्याचे माहे डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना काळात विद्यार्थ्यांची ऑनलाइन शिकवणी तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी शाळा संस्थांमार्फत नियमित व्यायाम व वैद्यकीय तपासणी करण्याचे काम सुरुच होते, तरीही सामाजिक न्याय विभागाने कोरोनामुळे निवासी शाळा बंद असल्यामुळे परिपोषण भत्ता देण्याचा प्रश्न उद्भवत नसल्याचे कारण दर्शविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही दिव्यांगांच्या संघटनांनी सामाजिक न्याय विभागाकडे घरपोच भत्ता देऊन दिव्यांगांच्या आरोग्याला हातभार लावण्याचा प्रयत्न करावा अशी मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागपूर जिल्ह्यातील समाजकल्याण विभागांतर्गत येणाऱ्या दिव्यांग शाळेतील विद्यार्थ्यांना प्रलंबित परिपोषण भत्ता तातडीने वितरित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

(३) या कार्यासनाकडे दिव्यांगांच्या शाळा/ कार्यशाळांच्या कोणत्याही संघटनेने घरपोच भत्ता देऊन दिव्यांगांच्या आरोग्याला हातभार लावण्याचा प्रयत्न करावा अशी मागणी आढळून येत नाही.

(४) कोविड-१९ महामारीच्या पार्श्वभूमीवर दिव्यांगांच्या विशेष शाळा बंद असल्याने परिपोषण भत्ता देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील औष्णिक वीज निर्मिती केंद्रामध्ये एफ.जी.डी. संयंत्र उभारणीच्या प्रक्रियेत अनियमितता झाल्याबाबत

**(१७) * १३१७२ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औष्णिक वीज निर्मिती केंद्रांमधील प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्याकरिता वीज निर्मिती केंद्रांमध्ये एफ.जी.डी. संयंत्र उभारणे अनिवार्य करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोराडी व पारस औष्णिक वीज निर्मिती केंद्रात एफ.जी.डी. संयंत्र उभारणीकरिता निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरही संयंत्रे अद्यापपर्यंत उभारण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औष्णिक वीज निर्मिती केंद्र कोराडी येथे एफ.जी.डी. संयंत्र लावण्याची प्रक्रिया सन २०१७ मध्ये सुरु करुन सदर काम रुपये ८०० कोटी किंमतीमध्ये देण्यात आले होते, परंतु नंतर ही प्रक्रिया रद्द करून सन २०१९ मध्ये रुपये ८५२ कोटी किंमतीमध्ये सदर काम अन्य एका कंपनीस देण्यात आले, परंतु काही कालावधीनंतर पुन्हा या कामाचे रिवर्स बिडींग काढून कामाचे मुल्य रुपये ११५४ कोटीपर्यंत वाढविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील औष्णिक वीज निर्मिती केंद्रांमध्ये प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने एफ.जी.डी. संयत्र बसविण्याबाबत व एफ.जी.डी. संयंत्र लावण्याच्या प्रक्रियेस जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) हे खरे आहे.

पर्यावरण, वन आणि हवामान बदल, मंत्रालय (MoEF & CC) भारत सरकार यांच्या औष्णिक वीज निर्मिती केंद्रासाठी पर्यावरण विषयक सुधारित निकषानुसार सर्व औष्णिक वीज केंद्रांनी नवीन पर्यावरणीय मानके साध्य करण्याच्या दृष्टीने त्यांच्याद्वारे एफ.जी.डी. संयंत्र लावणे अनिवार्य आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

महानिर्मितीच्या कोराडी व पारस औष्णिक वीज निर्मिती केंद्र येथे एफ.जी.डी. संयंत्र उभारणीसाठीची सुरु केलेली निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहेत. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कार्यादेश देऊन संयंत्र उभारणीचे काम नियोजित आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

कोराडी औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राच्या संच क्र. १० साठी संयंत्र उभारणीकरिता दिनांक ३० मे, २०१७ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. तद्नंतर स्पर्धात्मक दर मिळविण्याच्या दृष्टीने यापुर्वीची निविदा रद्द करुन संच क्र. ८, ९, १० साठी एकत्रित निविदा दिनांक ०१ मार्च, २०१९ ला काढण्यात आली. परंतु, विविध कारणास्तव सदर निविदा रद्द करुन दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२० रोजी नव्याने पात्रता निकष अंतर्भूत करुन नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. अद्याप सदर निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली नाही.

(४) हे अंशत: खरे आहे.

कोराडी औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रांतील संच क्र. ८, ९, १० साठी एफ.जी.डी. संयंत्र उभारणीकरिता राबविलेल्या निविदेतील प्रक्रियेबाबत शासनास तक्रार प्राप्त झाली असून त्याबाबत चौकशी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील विटभट्टी व्यवसायाचे अवकाळी पावसामुळे नुकसान झाल्याबाबत

**(१८) * १३५६६ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०२१ च्या अखेरीस व माहे जानेवारी, २०२२ मध्ये पडलेल्या अवकाळी पावसामुळे रायगड जिल्ह्यातील विटभट्टी व्यवसाय अडचणीत आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवकाळी पावसामुळे असंख्य कच्च्या विटा खराब झाल्या असून विटा पाडण्यासाठी जमा करून ठेवलेली माती पावसामुळे वाहून गेली तसेच विटा भाजण्यासाठी लागणारा भाताचा कोंडा, कोळसा व तूस देखील पावसामुळे भिजल्याने विटभट्टी लावण्यासाठी पक्या विटा पडण्यास अडचण निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर शासनाचे कडक निर्बंध तसेच टाळेबंदी तसेच अवकाळी पावसामुळे विटभट्टी मालकांचे व चालकांचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाकडून विटभट्टी चालक व मालकांसाठी अवकाळी पावसामुळे विटांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याबाबत कोणतीच तरतूद नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवकाळी पाऊस यासारख्या उद्भवलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे विटभट्टी व्यवसायिकांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई तातडीने मिळावी यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार :** (१) हे खरे नाही.
(२), (३), (४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील दिव्यांगांच्या अनुदानित विशेष शाळा/ कार्यशाळेच्या वसतिगृहातील अधीक्षक/ गृहपाल यांच्या वेतनाबाबत

**(१९) * १३३२१ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दिव्यांगांच्या अनुदानित विशेष शाळा/ कार्यशाळा, संबंधित कार्यरत वसतिगृह अधीक्षक/ गृहपाल यांना आदिवासी आश्रमशाळा/ वसतिगृह अधीक्षक यांच्याप्रमाणे वेतन देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप आणि सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू प्रस्तावावर निर्णय घेण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांच्याकडून प्रस्ताव प्राप्त झाला असून याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महावितरणकडून विविध प्राधिकरणांची थकीत देणी असल्याबाबत

**(२०) * १३४१९ श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेश कराड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कृषी वीजपंप ग्राहक, शेतकरी, सार्वजनिक पाणीपुरवठा आणि सार्वजनिक पथदिवे यांची थकीत देयके वसुल करण्यासाठी वीज पुरवठा खंडित करण्याशिवाय महावितरणकडे अन्य पर्याय शिल्लक नसल्याचे वक्तव्य मा.ऊर्जा मंत्री यांनी केले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महावितरण जलसंपदा, पवनचक्की, सौरऊर्जा आणि इतर प्राधिकरणांकडून वीज घेत असून या विजेचे टॉवर, पोल, डीपी इत्यादी शेतकऱ्यांच्या शेतात उभारुनही शेतकऱ्यांना त्याचा मोबदला व भरपाई अदा करत नाही तसेच महावितरणकडून या विविध प्राधिकरणांना देण्यात येणारी देयके गेली अनेक वर्षे दिली गेलीच नसल्याने सर्व यंत्रणाच बंद पडत असून यामुळे होणाऱ्या अतिरिक्त खर्चास निर्बंध घालून महावितरण थकीत देणी देणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सुत्रबध्द नियोजन करून मागेल त्याला वीज जोडणी व कंत्राटी पध्दत न वापरता महावितरण स्वत:च सर्व कार्यभार सांभाळणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महावितरणची आर्थिक स्थिती सुधारण्याच्या दृष्टीने महावितरणला थकीत अनुदान मिळावे यादृष्टीने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) हे खरे आहे.

(२) कोविड-१९ महासाथीमुळे व तसेच महावितरणच्या नाजूक आर्थिक परिस्थितीमुळे महावितरणकडून नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांना देण्यात येणाऱ्या वीज देयकांची रक्कम नियमितपणे देणे शक्य झाले नाही. परंतु, उपलब्ध आर्थिक पत पुरवठ्याप्रमाणे महावितरणने थकबाकी अदा केली आहे.

अपारंपारिक ऊर्जा प्रकल्पातून महावितरणद्वारा घेण्यात येणाऱ्या करारित प्रकल्पामध्ये प्रकल्प आस्थापित करण्याची व त्यासाठीची निष्कासन व्यवस्था उभारण्याची जबाबदारी प्रकल्पधारकांची असल्याने, मनोरे व वाहिन्याकरिता जमीन धारकांना नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी प्रकल्प धारकाची असते.

(३) मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार महावितरण कंपनीमार्फत मागेल त्याला वीज जोडणी देण्यात येते. नवीन वीज जोडणीकरिता आवश्यक पायाभूत सुविधा महावितरणमार्फत उभारण्यात येतात अथवा स्वत: उभारण्याचा पर्याय उपलब्ध आहे. महावितरणमार्फत नवीन वीज जोडणी निर्माण करण्याच्या पायाभूत सुविधा उभारणी सूचिबध्द कंत्राटदाराकडून करण्यात येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोराडी व खापरखेडा (जि.नागपूर) वीज केंद्रामुळे परिसरातील गावांना दूषित पाणीपुरवठा होत असल्याबाबत

**(२१) * १३०९० श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोराडी व खापरखेडा (जि.नागपूर) या दोन्ही वीज केंद्राजवळच्या २१ गावांतून घेतलेल्या पाण्याच्या नमुन्यामध्ये फ्लाय ॲशमध्ये आर्सेनिक, मर्क्युरी, फ्लोराइड यासारखे विषारी घटक मोठ्या प्रमाणात आढळून आले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे येथील नागरिकांना दूषित पाण्यामुळे अनेक गंभीर आजाराना सामोरे जावे लागत असून त्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोराडी व खापरखेडा विद्युत प्रकल्पांमुळे या भागातील पाण्याचे स्त्रोत प्रदूषित झाले असून प्रदुषणाचा विसर्ग तातडीने थांबवून प्रदुषणामुळे होणारे दुष्परिणाम दुर करण्याच्या दृष्टीने कोणत्या उपायोजना करण्यात आल्या आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोन्ही विद्युत केंद्रांजवळच्या २१ गावातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ नये याकरिता शुध्द पाण्याचा पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व केंद्र शासनाच्या वने, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालयाद्वारे केलेल्या पाण्याच्या नमून्याच्या संयुक्त पृथ:करण अहवालानुसार पिण्याच्या पाण्यात विषारी घटक जसे मर्क्युरी, आर्सेनिक, फ्लोराइड आढळून आले नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) मौजा कोराडी व खापरखेडा ता.कामठी, जि.नागपूर या दोन्ही वीज केंद्राजवळच्या २१ गावात पाण्याचा पुरवठा महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाद्वारे प्रादेशिक-ग्रामीण पाणीपुरवठा योजनेतून पाणी शुध्द करुन करण्यात येतो. तसेच काही गावांमध्ये DFU/ RO Unit बसविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औष्णिक विद्युत केंद्रातून निघणाऱ्या राखेसंदर्भात उपाययोजना करण्याबाबत

**(२२) * १३१७३ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औष्णिक विद्युत केंद्रातून बाहेर पडणाऱ्या राखेमुळे होणारे जल व वायू प्रदूषण टाळण्याकरिता या राखेचा उपयोग अन्य कारणासाठी करण्याबाबत केंद्र व राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(२) असल्यास, जुने झालेले आणि कोळसाधारित प्रदूषित विद्युत निर्मिती प्रकल्प टप्प्याटप्प्याने कमी करण्याच्या दृष्टीने राज्यातील सर्व विद्युत निर्मिती प्रकल्पांच्या प्रदूषण नियंत्रण उपाययोजनांचे लेखापरिक्षण करण्याचे शासनाने प्रस्तावित केले आहे काय, त्यानुषंगाने जे प्रकल्प विहित मानकांची पूर्तता करत नसतील त्यांच्यावर निर्णायक कारवाई होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोळशाबरोबर इंधन म्हणून बांबूच्या तुकड्यांचा वापर (बायोमास ब्रिकेट) तसेच तरंगत्या सौरऊर्जा इ. पर्यायांचा अवलंब करणे शासनाच्या विचाराधिन आहे काय, तसेच बायोमास बिकेटकरिता लागणाऱ्या साहित्याची उपलब्धता, त्यासाठी लागणारा खर्च कोळशाच्या तुलनेत किती आहे,

(४) असल्यास, शासनाने याबाबत आखलेल्या नियमावलीचे पालन न करता खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राने नविन नांदगाव ॲश पॉन्ड मध्ये राख साठविणे सुरू केले असल्याचे निदर्शनास आले आहे काय, असल्यास, प्रदूषण नियंत्रण मंडळाने याबाबत महानिर्मिती कंपनीस कारणे दाखवा नोटीस जारी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, महानिर्मिती कंपनीद्वारा शासनाच्या नियमावलींकडे दुर्लक्ष होण्याची कारणे काय आहेत तसेच या प्रकरणी चौकशी करून शासन सबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) केंद्रीय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाच्या दिनांक ३१/१२/२०२१ च्या अधिसुचनेनुसार, औष्णिक विद्युत केंद्रांमधून निघाणाऱ्या राखेसंदर्भात दिनांक ०१/०४/२०२२ पासून लागू होणाऱ्या तरतूदीनुसार इतर बाबींसोबत औष्णिक विद्युत केंद्रांतील वर्षभरात निर्माण होणाऱ्या फ्लाय ॲश व बॉटम ॲश चा तीन वर्षाच्या चक्रात सरासरी १०० टक्के वापर करण्यास जबाबदार राहील. तसेच, कोणत्याही परिस्थितीत राखेचा वापर ८० टक्के पेक्षा कमी होणार नाही अशा मुख्य तरतूदी आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

राज्य शासनाच्या धोरणानुसार कोळशासोबत बायोमास ब्रिकेट प्रायोगिक तत्वावर वापर करुन त्याची व्यवहार्यता तपासण्याची पुढील कार्यवाही महानिर्मिती कंपनीच्या स्तरावर सुरु आहे.

याशिवाय तरंगता सौर ऊर्जा प्रकल्प राबविण्याबाबत महानिर्मिती व महावितरणद्वारा विचाराधीन आहे.

(४) व (५) खापरखेडा औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रातील १x५०० मेगा वॅट क्षमतेच्या संचासाठी दिनांक ०२/०६/२००६ च्या केंद्रीय पर्यावरण व वातावणीय बदल मंत्रालयाकडून प्राप्त मंजूरीच्या अनुषंगाने दिनांक १६/०४/२०१२ पासून ५०० मेगा वॅट संच कार्यान्वित करण्यात आला आणि सदर संचाच्या राखेची विल्हेवाट नांदगाव राख बंधाऱ्यात माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये सुरु करण्यात आली होती. परंतु, दिनांक ०१/०२/२०२२ रोजी प्राप्त झालेल्या महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशानुसार नांदगाव राख बंधाऱ्यातील राखेची विल्हेवाट बंद करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.